CR202208052S



महाराष्ट्र शासन
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे
दुसरा मजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, पुणे -०१
दूरध्वनी क्र - ०२०-२६०५०००६ Email ID : Web site :https://mahabhumi.gov.in

क्र/गांवठाण/ड्रोनसर्व्हे/G.T/का.वि. ६५१/२०२२ पुणे दिनांक : ०५/०८/२०२२

परिपत्रक

विषय :- ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीच्या कामाबाबत.

राज्यात, गावठाण जमाबंदी प्रकल्प "स्वामित्व" योजनेचे काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पामध्ये ड्रोनसर्व्हे नंतर ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीकाम हे दोन अत्यंत महत्वाचे टप्पे पुर्ण करावे लागतात. प्रकल्पाचे यश हे या दोन टप्प्यामधील कामाच्या अचुकतेवर अवलंबून आहे.

जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून काही निवडक गावांमध्ये ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीच्या कामाची तपासणी केली असता खालील त्रुटी सकृतदर्शनी निदर्शनास आलेल्या आहेत.

१.रस्ते जागेवर अस्तित्वात असतांना ते ग्राऊंड ट्रुथींग (G.T) नकाशात घेतले नाहीत.

२.फक्त बांधीव मिळकतींचे ग्राऊंड ट्रुथींग (G.T) व नकाशा तयार केला असून धारकांच्या बांधकामालगतची जागा विचारात घेतली नाही.

३. बखळ जागा पुर्णपणे सोडली असून त्यास पॉलीगॉन पुर्ण करून नंबर ग्राऊंड ट्रुथींग (G.T) नकाशात दिलेले नाहीत.

४ .न्यायालयीन कार्यवाही चालु आहे, या कारणास्तव नकाशा तयार केला नाही. चौकशी केलेली नाही.

५. मोठया प्रमाणात बांधिव मिळकत, पडीत मिळकती चौकशीमधून सुटलेल्या आहेत.

यावरून असे स्पष्ट होते की, चौकशी अधिकारी, ग्राऊंड ट्रुथींग आणि चौकशीचे काम काळजीपुर्वक व गांभीर्याने करत नाहीत. महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम व नगर भुमापन नियमाचे तरतुदीनुसार चौकशी केली जात नाही.

या पार्श्वभुमीवर खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

६. उपरोक्त प्रसिध्दी /प्रख्यापना व्यतीरिक्त इतर सर्व कार्यवाही प्रचलीत नियम, परिपत्रक व कायदयाप्रमाणे करणेत यावी.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करावयाची आहे.

Signed by Niranjan K Sudhansu
Date: 30-05-2022 08:38:48
Reason: Approved

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य),पुणे